# संघराज्य व त्यांचे राज्यक्षेत्र




**Welcome**

MPSC Marathi Tutorials

विषय: राज्यघटना



कलम १(१) नुसार भारत हा राज्यांचा संघ असेल

१(२) नुसार घटकराज्य आणि केंद्रशासित प्रदेश यांची नवे आणि त्यांची राज्यक्षेत्रे पहिल्या अनुसुचित विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

कलम १(३) नुसार भारताचे राज्यक्षेत्र पुढील बाबीचे मिळून बनलेले असेल.
- घटकराज्यांची राज्यक्षेत्रे
- केंद्रशासित प्रदेश
- संपादित केली जातील अशी अन्य राज्यक्षेत्रे




कलम २ अन्वये संसदेला दोन अधिकार देण्यात आले आहेत.
- योग्य अटी व शर्तीवर नवीन राज्य संघराज्यात सामील करून घेण्याचा अधिकार.
- नवीन राज्य स्थापन करण्याचा अधिकार




भारताचे वर्णन 'भंजक राज्यांचा अभंजक संघ' (An Indestructible Union of Destructible States) असे करण्यात आले आहे.

'बदलणाऱ्या घटकराज्यांचे अविचल संघ' असे भारताचे वर्णन योग्य वाटते.




संसदेला कायद्याद्वारे
- नवीन राज्यांची निर्मिती करता येईल.
- कोणत्याही राज्याचे क्षेत्र वाढवता येईल.
- कोणत्याही राज्याचे क्षेत्र घटवता येईल
- राज्यांच्या सिमामध्ये फेरफार करता येईल
- राज्यांच्या नावामध्ये फेरफार करता येईल

मात्र यात दोन अटी आहेत.
- याचे विधेयक राष्ट्रपतींच्या शिफारसीशिवाय मांडता येत नाही.
- या शिफारसीपुर्वी राष्ट्रपतींना ते विधेयक संबंधित राज्याच्या विधीमंडळाकडे आपले विचार व्यक्त करण्यासाठी पाठवावे लागेल.

कलम ४ अन्वये असे घोषित करण्यात आले आहे की, कलम (२) व कलम (३) अतर्गत करण्यात आलेला कायदा कलम ३६८ अंतर्गत घटनादुरुस्ती कायदा समजण्यात येणार नाही.

भारतीय राज्यक्षेत्र परकीय देशास बहाल करण्यासाठी कलम ३६८ अंतर्गत घटनादुरुस्ती करण्याची आवश्यकता असेल. तसे विधेयक सध्या बहुमताने पारित करता येणार नाही.






डॉ.आंबेडकर यांच्या मते 'संघराज्य' ऐवजी 'राज्यांचा संघ' असा उल्लेख करण्याची दोन कारणे आहेत.
- भारतीय संघराज्ये अमेरिकन संघराज्याप्रमाणे करारद्वारे निर्माण झालेली नाहीत.
- घटकराज्यांना बाहेर फुटून पडण्याचा अधिकार नाही.

घटनेतील तरतुदी जम्मू काश्मीर वगळता सर्व राज्यांना समान प्रमाणात लागू होतात.






'भारताचा संघ' (□□□□ □□ □□□□ यामध्ये सर्व घटक राज्यांचा समावेश होतो. तर 'भारताचे राज्यक्षेत्र' (Territory Of India) याच्यात घटकराज्य, केंद्रशासित प्रदेश व संपादित केली जातील अशी भूप्रदेशे यांचा समावेश होतो.